स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्य विद्याशाखा अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संक्षिप्त आराखडा

* संशोधन विषय *

"स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास"

(विशेष संदर्भ : साधनाताई आमटे, सिंधुताई सपकाळ, उल्का महाजन, सुनिता भोसले, सरिता आवाड, पुष्पा भावे, अरुणा सबाने, रजिया सुलताना)

:: संशोधक ::

नागरगोजे गंगा हरी

सहशिक्षिका

जि.प.प्रा.शाळा दगडगाव ता.लोहा जि.नांदेड

:: मार्गदर्शक ::

डॉ. शिवशेट्टे नारायण अशोकराव

संशोधन मार्गदर्शक

सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग,

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर

ता.बिलोली जि.नांदेड

सप्टेंबर : २०२३

“स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास”

(विशेष संदर्भ साधनाताई आमटे, सिंधुताई सपकाळ, उल्का महाजन, सुनिता भोसले, सरिता आवाड, पुष्पा भावे, अरुणा सबाने, रजिया सुलताना)

अनुक्रमणिका

प्रकरण — पहिले

आत्मकथा : एक वाङ्मय प्रकार

प्रकरण — दुसरे

स्त्रियांच्या आत्मकथनातील कौटूंबिक जीवन संघर्ष

प्रकरण — तिसरे

स्त्रियांच्या आत्मकथनातील सामाजिक संघर्ष

प्रकरणे — चौथे

स्त्रियांच्या आत्मकथनातील आर्थिक जीवनसंघर्ष

प्रकरणे — पाचवे

स्त्रियांच्या आत्मकथनातील सांस्कृतिक जीवन संघर्ष

प्रकरण — सहावे

स्त्रियांच्या आत्मकथनातील साम्यभेद

प्रकरण — सातवे

स्त्रियांच्या आत्मकथनातील वाङ्मयीन भाषा विशेष

प्रकरण — आठवे

उपसंहार / निष्कर्ष

परिशिष्ट्ये

निवडक स्त्रियांचा जीवन व साहित्य परिचय

संदर्भ ग्रंथ सूची

“स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास”

प्रास्ताविक –

जीवनातील घटनांचा वृत्तांत सांगण्याऐवजी जेंव्हा त्यांना कथारुप दिले गेले व त्यांचे समोर श्रोतृवर्ग जणू उपस्थित आहे असे गृहीत धरुन कथन केले गेले. तेंव्हाच आत्मचरित्रांची ‘आत्मकथने’ झाली. आयुष्याच्या शेवटी जीवनाचा वृत्तांत सांगावा अशी धारणा आत्मचरित्रात असते. पण जीवनाचे कथनच करायचे आहे तर ते कोणत्याही टप्प्यावर करायचा हरकत नाही या विचारातून तरुणांनी स्वत:च्या जीवनाची हकिगती शब्दबद्ध केली व आत्मकथने उदयाला आली.

स्वतंत्र भारतातील उच्चविद्याविभूषित नामवंत, कारकीर्द प्राप्त झालेल्या सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या आत्मकथनातून सामाजिक कार्याची धूरा सांभाळण्याचे कार्य केले आहे. प्रत्येक क्षेत्रातील. नामवंत, गुणवंत सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या कौटुंबिक, सामाजिक संघर्षाला सामोरे जाऊन सामाजिक कार्‌य केले आहे. बिकट परीस्थितीवर मात करुन संघर्षाची झुंज देऊन आपल्या भारत देशात विविध प्रथा परंपरा असताना समाजाला एका वेगळ्या दिशेने नेण्याचे कार्य या सामाजिक कार्यकर्त्यानी पार पाडले आहे.

स्वातंत्र्यानंतर आपल्या समाजातील चालीरीती, प्रथा, परंपरा यांना संघर्ष करुन सामाजिक कार्यकर्त्यांनी आजपर्यंत प्रत्येक क्षेत्रात समाज कार्याचा एक ठेवा जपलेलाआहे. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी काबाड कष्ट करुन चाकोरीबदध चालीरीती प्रथा, परंपरा, चूल व मूल एवढेच कार्य असताना सुद्धा अतिशय संघर्षमय वातावरणातून समाज कार्याची धुरा सांभाळलेली आहे. संकटमय परिस्थिती असताना प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊन सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या कार्याचा अनमोल ठेवा समाजाला आदर्श घालून दिला आले. जसे की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मदर टेरेसा, रमाबाई रानडे इ.

साहित्यात जीवनानुभवाचा आविष्कार असतो. त्याच प्रमाणे जीवन भाष्यही असतो. आत्मचरित्र हा प्राथमिक स्त्रोत आहे.कारण हे एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचा लेखाजोखा आहे.

आत्मचरित्र व्यक्तीच्या जीवनाबद्दल , विचाराबद्दल आणि अनुभवांबद्दल प्रथम हाताने माहिती प्रदान करते.

मराठी वाङ्मयामध्ये 'आत्मचरित्र' हा चरित्रापेक्षा मोठा चैतन्यमय, चित्तवेधक व जिव्हाळ्याचा वाटतो. कारण चरित्रलेखन तिसऱ्या व्यक्तीने तटस्थ भावनेने लिहिले असते 'आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकारात लेखकांचा आत्मा प्रतिबिंबित होतो. या आत्माविष्कारामुळे आत्मकथन / आत्मचरित्र वाङ्मयप्रकार अधिक चैतन्यमय व चटकदार वाटतो. त्यात आत्म्याचा, स्वत:चा किंवा मनाचा अविष्कार असतो.

आत्मचरित्र हे एका व्यक्तिचे चरित्र असून ते तिचे स्वत:चे लेखन असते. यातून लेखक आपल्या जीवनाचा पट स्वत: उलगडून दाखवतो. स्वत: अनुभवलेल्या जीवनाचे चित्र स्वत:च रेखाटलेले असते. म्हणून प्रत्येक आत्मचरित्र आणि आत्मकथन हा लेखकाचा 'स्व' जीवनाचा इतिहास असतो.

आत्मचरित्रात जीवनातील अनुभव,संघर्ष, यश आणि दृष्टिकोन यांचे जिव्हाळ्याचे वैयक्तिक वर्णन आहे. आत्मचरित्र स्वत:द्वारे कथन केले स्वत:चे चरित्र आत्मचरित्रात्मक कार्ये अनेकरुपे घेऊ शकतात, जीवना दरम्यान केलेला अंतरंग लेखनापासून ते एका औपचारिक आत्मचरित्रापर्यंत पत्रे, डायरी, जर्नल्स, स्मरणपत्रांसह लिखान केलेले असते.

विषय निवडीसंबंधीची भूमिका

स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास करावयाचा आहे. आत्मकथन म्हटले की ते आत्म्यापासून उत्सफुर्तपणे आलेले असते. त्यात कोणतीच गोष्ट किंवा घटना बनावट राहत नाही.

जीवनातील संघर्ष हे केंव्हाही विसरत नाही. बऱ्याच ह्या अपोआप घडत नसतात. त्यांच्या पाठीमागे काही तरी भूमिका असते त्यांच्या पाठीमागे कोणतीतरी प्रेरणा असते. त्या बळावरच त्या ह्या पर्यंत पोहचतात. सिंधूताई सपकाळाचा कार्यकाळ पाहिला तर पूर्वी खूपच हालाखीच्या परिस्थीतीतून त्या आल्या. सामाजिक व आर्थिक विवंचनेतून त्यांनी मार्ग काढला. आत्मकथनात्मक लेखनाचे स्वरुप प्रत्येयकारी असते. वाचकाच्या अत:करणाला स्पर्शून त्याला विचार करण्यास प्रवृत्त करणे हा अनुभव एखाद्या आत्मकथनातील आस्वाद

घेतल्यानंतर निश्चितपणे येत असतो. आत्मकथने हे वास्तवदर्शी असतात. यात स्वत:च्या जीवनातील वास्तवतेचा वेध घेतलेला असतो. त्यामूळे लेखकाचा जीवनानुभव प्रकट होत असतो. अशा आत्मकथनात कल्पनेपेक्षा वास्तवतेला अधिक महत्त्व दिलेले असते.

स्त्रियांच्या आत्मकथनातून लेखिकांच्या गतआयुष्यातील सुखदु:ख भावभावना, कुटुंबातील स्थान समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, चालीरीती, श्रद्धा, अंधश्रद्धा रुढी, परंपरा इत्यादी गोष्टीचा जवळून परिचय होतो. त्याचबरोबर तत्कालीन सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, वाङमयीन वातारवण प्रतिबिंबीत झालेले असते. तसेच लेखिकेचा जीवनविषयक दृष्टीकोन त्यांचा स्वभाव धारणा विचारसरणी जीवन जगण्याची शैली लेखिकेचे वैयक्तिक आयुष्य, साहित्यिक जीवन इत्यादीचा जवळून परिचय होतो. त्यामूळे 'स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास' या विषयाची निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व :-

आत्मचरित्रात जीवनाचा वृत्तांत लेखकाने मांडलेला असतो. त्यात त्याच्या वैयक्तिक जीवनाचा तपशील असतो. आत्मचरित्रकार आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना स्व-परिप्रेक्ष्यातून पाहत व अनुभवत असतो. त्या घटनांकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन साहजिकपणे स्व-सापेक्ष असतो. आत्मचरित्रातील अनुभव वा वास्तव कथन हे व्यक्तिनिष्ठ असते.

आत्मचरित्रामध्ये आत्मचरित्रकार घटनांची निवड करुन मांडणी करीत असतो. जीवनातील सगळ्यांच घटना नमूद करणे वा सांगणे कोणालाच शक्य नसते. आवश्यकही नसते. तेंव्हा अशा निवडीतून स्वत:च्याच जीवनाची एक प्रतिकृती आत्मचरित्रकार साकार करीत असतो. ही आत्मचरित्रकाराच्या जीवनाची प्रतिकृतीच असते.

आत्मकथनात आत्मविष्काराची मानवी प्रवृत्ती नैसर्गिक व सार्वत्रिक असते. आत्मकथनामागे आत्माविष्काराची प्रेरणा असते. आत्मजीवनाच्या अर्थपूर्णतेची अभिज्ञता, स्वानुभवांतील निकडीची दृष्टी आणि लेखन शैली विषयक भान अशा गोष्टी प्रेरक असतात

तसेच ऐतिहासिक साहित्यकृतीप्रमाणे विशिष्टतेकडून सामान्यतेकडे जाण्याची क्षमता त्यात असते. म्हणून आत्मकथन एक ललित गद्यप्रकार मानला जातो.

आत्मचरित्रातील केंद्र स्वत: लेखक असतो. जागतिक आत्मचरित्रावर वाङ्मयात ज्यांना निर्विवादपणे उच्चस्थान आहे. असे भारतीय साहित्य म्हणजे महात्मा गांधीजींचे 'सत्याचे प्रयोग' होय. आणि पंडित जवाहरलाल नेहरू याचे 'आत्मकथन' होय प्राचीन मराठीला नामदेव, तुकाराम संतांच्या काव्यात आध्यात्मिक आत्मचरित्र् दिसून येते.एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील कथा असते जी- त्या व्यक्तीची स्वलिखीत असते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

'स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवन संघर्षाचा अभ्यास' या विषयाच्या अनुषंगाने संशोधन कार्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण उद्देश निश्चित केले आहेत ते पुढील प्रमाणे

१) मराठी साहित्यातील आत्मचरित्र आणि आत्मकथने समजून घेणे.

२) स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवन संघर्षाचा अभ्यास करणे.

३) स्त्रियांच्या आत्मकथनातील कौटूंबिक जीवनसंघर्ष समजून घेणे.

४) स्त्रियांच्या आत्मकथनातील सामाजिक जीवनसंघर्ष समजून घेणे.

५) स्त्रियांच्या आत्मकथनातील सांस्कृतिक जीवन संघर्षाचा शोध घेणे.

६) स्त्रियांच्या आत्मकथनातील आर्थिक जीवनसंघर्षाचा अभ्यास करणे.

७) स्त्रियांच्या आत्मकथनातील साम्य आणि भेद समजून घेणे.

८) स्त्रियांच्या आत्मकथनातील वाङ्मयीन भाषाशैलीचा अभ्यास करणे.

९) स्त्रियांची होणारी मानसिक अस्थिरता आत्मकथनातून अभ्यासणे.

संशोधनाची साधने / साधनसामग्री :-

संशोधन विषयाच्या अनुषंगाने माहिती संकलित किंवा एकत्रीत करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात साधन म्हणून मुलाखत व निरीक्षण या तंत्राचा वापर करण्यात येत आहे.

याच बरोबर संबंधीत साहित्य म्हणुन सामाजिक कार्यकर्त्या लेखिकांच्या आत्मकथन आणि इतर लेखिकांच्या संशोधनाशी संबंधीत असलेल्या साहित्याचा परामर्श घेण्यात येणार आहे.

संशोधन अभ्यास पद्धती :-

ज्ञानाचा कोश इतका विस्तृत आणि अखंड आहे की, त्यास समग्ररुपात प्राप्त करता येत नाही. त्यासाठी संशोधकास विषयाचे छोटे-छोटे विभाग करुन ज्ञान प्राप्त करावे लागते. त्यासाठी अनेक अशा संशोधनाच्या पद्धती अवलंब कराव्या लागतात.

'सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास' या प्रबंध लेखनात समीक्षणात्मक, तुलनात्मक, चिंतनात्मक, निरीक्षणात्मक या संशोधन पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रस्तुत प्रबंध लेखनात ग्रंथालयाची मोठ्या प्रमाणात मदत घेण्यात येईल ग्रंथालय ही प्रस्तुत संशोधनाची प्रयोगशाळाच ठरणार आहे. त्याचबरोबर प्रस्तुत संशोधनासाठी आधारभूत ग्रंथ, संदर्भग्रंथ, शब्दकोश, नियतकालिके, मासिके, इत्यादिनी सुसज्य अशा ग्रंथालय स्वरुपात लाक्षणिक अर्थ संशोधनासाठी प्रयोगशाळा वरदान ठरणार आहे.

संशोधनाची क्षेत्र व मर्यादा –

संशोधनात वस्तुनिष्ठ आणि वास्तवाप्रत येण्यासाठी क्षेत्र / व्याप्ती व मर्यादा निश्चित करणे आवश्यक असते. म्हणून 'स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास' हा विषय निवडला आहे. प्रस्तुत संशोधनात लेखिकांच्या आत्मकथनात्मक वाङ्मयात आलेला जीवनसंघर्ष याचा शोध काही प्रसिद्ध लेखिकांच्या आत्मकथनाच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे.

निवडलेल्या स्त्रियांची आत्मकथने

१) साधनाताई आमटे - समिधा

२) सिंधूताई सपकाळ - मी वनवासी

३) उल्का महाजन - कार्य आणि कार्यकर्ते

४) सुनिता भोसले - विंचवाचे तेल

५) सरिता आव्हाड - हमरस्ता नाकारताना

६) पुष्पा भावे - लढे आणि तिढे

७) अरुणा सबाने - सूर्य गिळणारी मी

८) रजिया सुलताना - रजनी ते रजिया

संशोधनाची गृहितके :-

कोणत्याही विषयावर संशोधन कार्य करण्यापूर्वी संशोधन कार्याच्या संदर्भात काही गृहितके तयार केली जातात. त्यामुळे संशोधक कार्यात एक निश्चित दिशा प्राप्त होऊन संशोधन कार्य यशाच्या मार्गाकडे जात असते प्रस्तुत संशोधन कार्यासाठी उपयुक्त असे गृहितके नोंदविले आहेत ते पुढील प्रमाणे.

१) स्त्रियांच्या आत्मकथनातील योगदान महत्त्वपूर्ण हे दिसून येते.

२) साधनाताई आमटे, सिंधूताई सपकाळ, सुनिता भोसले, पुष्पा भावे, उल्का महाजन, सरिता आवाड, अरुणा सबाने, रजिया सुलताना या लेखिकांच्या आत्मकथनातून कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवन संघर्ष अभिव्यक्त होत असल्याचे दिसून येते.

३) स्त्रियांच्या आत्मकथनातून कुटूंबातील व समाजातील स्वरुप दारिद्रय अज्ञान व व्यसनाधीनता अनेक अंगी / विविधांगी असल्याचे दिसून येते.

४) अभ्यासासाठी निवडलेल्या स्त्रियांच्या लेखिकांच्या व्यक्तीमत्त्वाचे स्वरुप विविधांगी व्यापक व सखोल पातळीवर असल्याचे दिसून येते.

५) अर्थिक परिस्थितीमुळे स्त्रियांची मानसिक कोंडी निदर्शनास येते.

६) स्त्रियांच्या आत्मकथनातील कौटूंबिक, सामाजिक, पार्श्वभूमीचा सामाजिक कार्यकर्त्यांच्या व्यक्तीमत्वावर निर्णायक प्रभाव पडल्याचे दिसून येते.

प्रकरण योजना

'स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास' या प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करीत असताना त्यात सुयोग्यपणा यावा या हेतूने विषयाची रचना सात प्रकरणात करण्यात आली आहे.

ती प्रकरणे पूढील प्रमाणे आहेत. :

प्रकरण – १ ले	आत्मकथन एक वाङ्मयप्रकार
प्रकरण – २ रे	स्त्रियांच्या आत्मकथनातील कौटुंबिक जीवन संघर्ष
प्रकरण –३ रे	स्त्रियांच्या आत्मकथनातील सामाजिक जीवन संघर्ष
प्रकरण – ४ थे	स्त्रियांच्या आत्मकथनातील आर्थिक जीवन संघर्ष
प्रकरण – ५ वे	स्त्रियांच्या आत्मकथनातील सांस्कृतिक जीवन संघर्ष
प्रकरण – ६ वे	स्त्रियांच्या आत्मकथनातील साम्यभेद
प्रकरण – ७ वे	स्त्रियांच्या आत्मकथनातील वाङ्मयीन भाषा विशेष
प्रकरणे - ८ वे	उपसंहार / निष्कर्ष

प्रकरणाचा संक्षिप्त आराखडा

संशोधन कार्याची व्याप्ती व मर्यादा

संशोधन विषयाच्या अनुषंगाने सरळता तसेच संपन्नता येण्यासाठी, अभ्यासात सुविधा आणि विषयाच्या व्यापकतेच्या दृष्टीने संशोधक शोधप्रंबध प्रकरणामध्ये विभागून **'स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास'** (विशेष संदर्भ – साधनाताई आमटे, सिंधुताई सपकाळ, उल्का महाजन, सुनिता भोसले, सरिता आवाड, पुष्पा भावे, अरुणा सबाने, रजिया सुलताना) याविषयाच्या अनुषंगाने समीक्षण करुन संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.

प्रकरण पहिले : आत्मकथन : एक वाङ्मयप्रकार

सदर प्रकरणातून आत्मकथन म्हणजे काय ? लेखनाचा हेतू, आत्मकथनाचे महत्व, आत्मकथन लेखनाचे प्रकार, चरित्र-आत्मचरित्र आत्मकथनातील वेगळेपण, मराठी साहित्यातील आत्मकथनाची परंपरा सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांची आत्मकथने विषयी सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

आत्मकथनात लेखकाचा आत्मा प्रतिबिंबित होतो. त्यामुळे आत्मकथन वाङ्मयप्रकार मोठा चैतन्यमय, चित्तवेधक व जिव्हाळ्याचा वाटतो आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्ववाचे स्वत: लेखकाने लेखन रुपाने घडविलेले दर्शन म्हणजे ‘आत्मचरित्र’ होय. आत्मचरित्रात आत्मचरित्रकार आपल्या अंतर्मनातून बाह्य व्यक्तिमत्त्वाकडे आठवणी आणि अनुभव आयुष्याच्या शेवटी मांडतो. आत्मचरित्रामध्ये त्याचे बालपण त्याची पूर्वपरंपरा त्याच्या कर्तृत्वाचे क्षणआप्तेष्ट सांस्कृतिक जाणिवा इ. प्रतिबिंब उमटलेले दिसते. व्यक्तिच्या जन्मापासून आत्मचरित्राची सुरूवात होते. याद्वारे अर्थपूर्ण जगणे प्रामाणिकपणे वाचकापुढे आत्मचरित्रकार मांडतो.

आत्मकथनाची सुरवात संस्कृतीच्या जन्मापासून झालेली दिसते. कथा, कविता, कादंबरी, नाटक इ. वाङ्मयाप्रमाणे आत्मचरित्र ही एक वाङमय प्रकार आहे. पण त्याच्या प्रेरणा व स्वरुप ही इतर वाङ्मय प्रकारापेक्षा भिन्न आहेत. प्राथमिकपणा, तटस्थवृत्तीने लेखन आत्मचरित्रात दिसते. आत्मकथन हा एक वैशिष्ट्यपुर्ण वाङ्मयप्रकार आहे. आत्मकथन हे एका व्यक्तीचे जीवनानुभव असून आत्मकथनकार ते तिने स्वत: लिहिलेले असते. आत्मकथनकार आपल्या जीवनाचा पट स्वत:च उलगडून दाखवतो स्वत: अनुभवलेल्या जीवनाचे चित्र स्वत:च रेखाटतो म्हणुन प्रत्येक आत्मकथन हा लेखकाचा ‘स्व’ जीवनाचा इतिहास असतो. प्रत्येक संशोधनात प्रकरण एक मध्ये आत्मकथन या वाङ्मयप्रकाराची सविस्तर माहिती मांडण्यात येणार आहे.

आत्मकथन वाङ्मय प्रकाराची संकल्पना स्पष्ट करतांना काही अभ्यासकांनी आत्मकथनाविषयी मांडलेल्या व्याख्यांचा अभ्यास केला जाणार आहे. आत्मकथनाचे स्वरुप विशेष सांगतांना आत्मकथनातून सामाजिक कार्यकर्त्यांच्या कौटूंबिक जीवनसंघर्ष, सामाजीक जीवनसंघर्ष, सांस्कृतिक जीवनसंघर्षाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आत्मकथनात सत्यकथन तटस्थवृत्ती ‘स्व’ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशल मांडणी वस्तुस्थिती दर्शक निवेदन व्यक्तिचित्रण, सामान्यज्ञान, निवेदन शैली, व्यक्तीनिष्ठता मुल्यगर्भ दृष्टीने घेतलेला आत्मशोध इ. आत्मकथन स्वरुप-विशेषांचा परामर्श घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : स्त्रियांच्या आत्मकथनातील कौटूंबिक जीवनसंघर्ष

प्रस्तुत संशोधनात प्रथमत: संघर्ष-अर्थ, व्याख्या आणि स्वरुप या संदर्भात संघर्षाचा अर्थ आणि व्याख्या संघर्षाचे स्वरुप स्पष्ट करण्यात येणार आहे. तसेच कुटूंब संकल्पनाचे विवेचन करण्यात येणार आहे. भारतीय संस्कृतीत कुटूंब हा आजही अविभाज्य घटक मानला जातो. कुटूंब या संकल्पनेत एकत्र राहणे एकाच छपराखाली राहणे एवढे अभिप्रेत नाही तर शरीराने व मनाने एकमेकांशी बांधील राहणे हे अपेक्षीत असते म्हणून कुटूंबातील कोणाचे एकाचे दु:ख व आनंद त्या एकट्याचाच राहत नाही त्याच्या प्रतिक्रिया कुटूंबातील अन्य मंडळीवर उमटत असतात. मराठीतील आत्मकथनातून कौटूंबिक नातेसंबंध उलघडतात याची प्रचिती संशोधनातील सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मकथनात प्रखरपणे कशी मांडली याचा शोध घेण्यात येणार आहे.

सदरील प्रकरणात दुसऱ्या विभागात सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मकथनातील कौटुंबिक जीवनसंघर्ष यात साधनाताई आमटे एक कर्मट ब्राम्हण घरात जन्मलेल्या साधनाताईने समाजाच्या विरोधात जाऊन बाबांना साथ दिली त्यांच्याबरोबर कुष्टरोग्यांची सेवा केली आनंदवन घडवतांनाही त्यांची बाबांना मोलाची साथ लाभली बाबा आमटे बरोबरच्या त्याग आणि सेवामय सहजिवनाची काहींनी अत्यंत साध्याशब्दात साधना आमटे यांनी त्यांच्या आत्मचरित्रात ‘समीधा’ मध्ये कशी वर्णन केले आहे. याचा शोध घेतला जाणार आहे.

सिंधुताई सपकाळ यांच्या ‘मी वनवासी’ याआत्मकथनातील कौटूंबिक संघर्ष सुनिता भोसले या पारधी समाजातील सामाजीक कार्यकर्त्या यांनी ‘विंचवाच तेल’ या आत्मकथनात मांडलेला जीवन संघर्ष यांचा उहापोह केला जाणार आहे. त्याच बरोबर उल्का महाजन यांनी रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांसाठी केलेले सामाजिक कार्य त्यांच्या ‘कार्य आणि कार्यकर्ते’ या आत्मकथनातून केलेले चित्रण याचा शोध घेतला जाणार आहे.

पुष्पा भावे यांच्या 'लढे आणि तिढे', सरिता आवाड यांच्या 'हमरस्ता नाकारतांना' अरुणा साबणे 'सूर्य गिळणारी मी' रजिया सुलताना यांच्या 'रजनी ते रजिया' या आत्मकथनातील कौटूंबिक जीवन संघर्षाचा शोध घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : स्त्रियांच्या आत्मकथनातील सामाजिक जीवनसंघर्ष

प्रस्तुत प्रकरणात समाज-अर्थ, व्याख्या,स्वरुप यात समाज या शब्दाचा अर्थ व्याख्या आणि समाजाचे स्वरुप यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच सामाजिक जीवन संघर्षाचे स्वरुप स्पष्ट करण्यात येणार आहे. समाज या संकल्पनेला समाजशास्त्राच्या अभ्यासात गेल्या अनेक वर्षाचा इतिहास आहे. हा इतिहास सरळ रेषेत पुढे जाणारा आहे. विकासक्रम दाखवणारा आहे. असे म्हणता येणार नाही. समुहात राहणाऱ्या व्यक्तीमध्ये असणाऱ्या संबंधाची व्यवस्था म्हणजे समाज, मानव हा समाज प्रिय प्राणी आणि या उक्तीनुसार दैनंदिन व्यवहारात समाज हा शब्द धर्म, जात, वंश, वर्ण, लिंग आदि भेदातील स्त्री पुरूषाच्या जनसमूदाय या अर्थी वापरला जातो. तो अगदी सैलपणे ढोबळ व प्रसंगानुरूप बदलणाऱ्या संकुचित व मर्यादीत अर्थाने वापरला जातो उदा. भारतीय समाज, आर्य समाज, हिंदू समाज इ.

समाज म्हणजे सामान्य प्रदेश, परस्पर संवाद आणि संस्कृती असलेल्या लोकांचा समुह विविध अशा नात्यानी अथवा संबंधानी आणि वर्तन विशेषांनी बांधल्या गेलेल्या व्यक्तीच्या संघटनात्मक स्वरुपाला समाज असे म्हणतात. समाजाची एक विशिष्ठ स्वरुपाची अशी ओळख असते. जी समाजातील लोकांच्या वर्तनातून पटत असते. व्यक्ती-व्यक्तीत, व्यक्तीसमुहात आणि समुह समुहात स्थिर स्वरुपी सामाजिक संबंध निर्माण होवुन त्याची एक व्यवस्था अस्तित्वात आल्यानंतरच त्याला समाज म्हटले जाते. समाजाला स्वत:ची अशी संरचना असते त्याला सातत्य असते भौतिक वस्तुमधील संबंधाहून सामाजिक संबंध अगदी निराळे असतात. समाजात एक व्यक्ती म्हणुन लेखिकेची जडणघडण होते याचा अर्थ लेखक त्यांच्यावर होणाऱ्या सर्व पारंपारीक संस्काराचा स्विकार करतो असा नाही. लेखक पारंपारीक संस्काराच्या मुल्य व्यवस्थेचा वा कल्पनांचा स्विकार करील. त्याला नकार देईल किंवा अंशत:

स्विकार करुन त्यांना नवा अर्थ देण्याचा प्रयत्न करील लेखकाच्या या स्वीकार नकारामागे त्यांचे व्यक्ती म्हणून असणारे वैशिष्ट्ये क्रियाशील असते. परंतू याचा अर्थ हा स्वीकार नकार केवळ व्यक्तीगत असतो. असा भाग नाही. कारण स्वीकार नकाराच्या भूमिकेला सामाजिक वास्तवाचा आधार असतो.

प्रस्तुत प्रकरणात स्त्रियांच्या आत्मकथनातून सामाजिक संघर्षाचा अभ्यास केला जाणार आहे.

साधनाताई आमटे एक त्यागी समाज सेविका त्यांनी लिहिलेल्या 'समिधा' या आत्मकथनातून सामाजीक जीवनसंघर्षाचा शोध घेण्यात येणार आहे. सिंधूताई सपकाळ या 'मी वनवासी' या आत्मकथनातून भारतीय अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी जीवन व्यथीत केले. त्यांचा तो संघर्ष कौटूंबिक व सामाजिक संघर्षाचा अभ्यास केला जाणार आहे. पारधी समाजातील स्त्रिचे भिषण वास्तव सुनिता भोसले यांच्या 'विंचवाच तेल' या आत्मकथनातील सामाजिक संघर्ष प्रस्तुत संशोधनात अभ्यासला जाणार आहे.

प्रकरण चौथे : स्त्रियांच्या आत्मकथनातील आर्थिक जीवनसंघर्ष :

स्त्रियांच्या आत्मकथनातील आर्थिक जीवनसंघर्ष या प्रकरणातील पहिल्या विभागात आर्थिक जीवन संघर्ष म्हणजे काय ? अर्थ व्याख्या स्वरुप या अनुषंगाने चर्चा करण्यात येईल.

सदरील प्रकरणात दुसऱ्या विभागात स्त्रियांच्या आत्मकथनातील अर्थिक परिस्थितीचा लेखिकांच्या व्यक्तिमत्वावर निर्णायक प्रभाव पडल्याचे जाणवत आहे. सिंधुताई सपकाळ यांच्या आत्मकथनातून आर्थिक पिळवणूक तसेच प्रतिकूल परिस्थितीचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसून येते आहे. सुनिता भोसले, सिंधूताई सपकाळ, यांच्या व्यक्तिमत्व आकार घेण्यामध्ये आर्थिक परीस्थितीचा परिणाम जाणवत असल्याचे दिसूनयेते. सुनिता भोसले यांच्या 'विंचवाचे तेल' या आत्मकथनातून त्यांनी घरची परीस्थिती बिकट असतांना भिक मागून छोट्या भावाचा सांभाळ करत कुटूंबाचा सांभाळ केला. तसेच सिंधूताई सपकाळयांनी रेल्वेत गाणी, भजन म्हणून उदरनिर्वाह चालवला. सदरील प्रकरणातून साधनाताई आमटे, सिंधुताई सपकाळ,

उल्का महाजन, सुनिता भोसले, सरिता आवाड, पुष्पा भावे, अरुणा सबाने, रजिया सुलताना यांच्या आत्मकथनातील आर्थिक जीवनसंघर्षाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे : स्त्रियांच्या आत्मकथनातील सांस्कृतिक जीवनसंघर्ष

सदरील प्रकरणात पहिल्या विभागात संस्कृती: अर्थ आणि स्वरुप अंतर्गत संस्कृती शब्दाचा अर्थ, व्याख्या आणि संस्कृतीचे स्वरुप याविषयी विस्तृतपणे चर्चा करण्यात येणार आहे.

'संस्कृती' हा शब्द इंग्रजीतील (Culture आणि Civilization) यांचा पर्यायी प्रतिशब्द आहे. संस्कारानी ज्याची सिद्धी झालेली असते ती संस्कृती म्हणून संस्कार आणि संस्कृती या दोन्हीचा अविभाज्य संबंध आहे. हे दोन्ही शब्द संस्कृतमधील सम आणि कृ धातूपासून सिद्ध झालेले आहेत. वाच्यार्थाने संस्कार हा शब्द धर्म नीती इ. क्षेत्रापुरताच मर्यादित राहिला आणि धर्मासह समग्र जीवनाच्या अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द रुढ झाला. संस्कृतीची शब्दार्थ खूप व्यापक आहे त्याबद्दल सविस्तर विवेचन या प्रकरणात करण्यात येणार आहे.

संस्कृतीबरोबरच प्रकृती आणि विकृती हे दोन शब्द लक्षात घेता त्यांचा परस्परसंबंध आहे प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे प्रकृतीत बिघाड होवो. अथवा प्रकृतीला विकार जडणे आणि प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये या उद्देशाने प्रकृतीवर करावयाचा संस्कार म्हणजे संस्कृती.

प्रस्तुत प्रकरणात दुसऱ्या विभागात स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवन संघर्षाचा अभ्यास यात साधनाताई आमटे, सिंधुताई सपकाळ, उल्का महाजन, सुनिता भोसले, सरिता आवाड, पुष्पा भावे, अरुणा सबाने, रजिया सुलताना या सामाजिक कार्यकर्त्यांनी लिहिलेल्या अनुक्रमे 'समीधा', 'मी वनवासी', 'विंचवाचे तेल', 'लढे आणि तिढे', 'कार्ये आणि कार्यकर्ते', 'हमरस्ता नाकारताना', 'सूर्य गिळणारी मी', 'रजनी ते रजिया' या आत्मकथनाचा समावेश करण्यात येणार आहे.

भारतीय समाजात संस्कृती हा घटक महत्त्वाचा आहे. एका कर्मठ घरात जन्मलेल्या साधनाताईंनी समजाच्या चालीरीती, प्रथा रुढी, परंपरा यांच्या विरोधात जाऊन बाबा आमटे

यांना साथ दिली व कुष्टरोग्यांची सेवा केली हा संस्कृतिक जीवनसंघर्ष समीधा या आत्मकथनात मांडण्यात येणार आहे.

सिंधूताई सपकाळ यांच्य 'मी वनवासी' या आत्मकथाद्वारे संस्कृतीक संघर्ष विंवेचन करण्यात येणार आहे. पारधी समाजातील स्त्रीच भीषणं वास्तव कथेचं चित्रणं सुनिता भोसले यांच्या 'विंचवाचे तेल' या आत्मकथनातून मांडण्यात येणारआहे.

सिंधूताई सपकाळ अनाथाची माय म्हणून ओळखल्या जातात सिंधूताई यांच्या घराण्यात कोणतेही कौटूंबिक शैक्षणिक वातावरण नव्हते जंगलात लाकूड फाटा शेण गोळा करतांना सापडलेले कागदाचे तुकडे गोळा करुन त्यातून शिक्षण घेण्याचा ओढा होता. सिंधूताई सपकाळ यांना विवाह वयाच्या ९ व्या वर्षी झाला. घरी प्रचंड सासुरवास होता वयाच्या अठराव्या वर्षी तीन बाळंत पण झाली आणि चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यानी आयुष्यातला पहिला संघर्ष केला. आपल्या भारतीय संस्कृतीशी लढा देऊन केलेला जीवनसंघर्ष या प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

पुष्पा भावे मराठी प्राध्यापिका विद्यार्थीप्रिय शिक्षक मराठीतील स्त्रीवादी साहित्य सिद्धांत, चळवळ आणि साहित्य समीक्षेला पुष्पा भावे यांनी गंभीर परिणाम मिळवून दिले. त्याच बरोबर सामाजिक व वाङ्मयीन चळवळीला संस्थात्मक पाया देण्यात पुष्पा भावे यांचा सहभाग मोलाचा ठरला त्यामुळे त्यांचा लढे आणि तढे हा आत्मकथनावर ग्रंथ सांस्कृतिकदृष्ट्या मोलाचा ठरणार आहे. याचे विवेचन या प्रकरणात मांडण्यात येणार आहे. त्याच बरोबर सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, सरिता आवाड, अरुणा साबने, रजिया सुलताना यांच्या आत्मकथनातील सांस्कृतिक जीवन संघर्षाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहावे : स्त्रियांच्या आत्मकथनातील साम्यभेद

प्रस्तुत संशोधनातील सामाजिक कार्यकर्त्यांची आत्मकथन व्यक्तिनिष्ठता असून प्रत्येकांचे जीवनानुभव वेगवेगळे आहेत. प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्यांची आत्मकथने वेगवेगळ्या क्षेत्राशी निगडीत आहेत. सामाजिक कार्य जरी सारखे असले तरी त्यांची कार्यक्षेत्र विभिन्न आहे. त्याचा साम्य आणि भेद याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केला जाणार आहे.

प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्यांनी काम वेगवेगळ्या क्षेत्रात केले आहे. आत्मचरित्रातील अनुभव वा वास्तव कथनहे व्यक्तिनिष्ठ असते. अशा व्यक्तिनिष्ठ अनुभवकथनातील वस्तुनिष्ठा संशोधक या प्रकरणातून अभ्यासणार आहे.

प्रकरण सातवे –स्त्रियांच्या आत्मकथनातील वाङ्मयीन भाषा विशेष

शोधप्रबंधाच्या सातव्या प्रकरणातून स्त्रीयांच्या आत्मकथनातून वाङ्मयातील विशेषांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रस्तुत प्रकरणात साधनाताई आमटे यांचे समिधा, अनाथाची माय सिंधुताई सपकाळ यांच्या मी वनवासी सुनिता भासले यांच्या विंवचाचे तेल, पुष्पा भावे यांच्या लढे आणि तिढे, उल्का महाजन यांच्या कार्ये आणि कार्यकर्ते, सरिता आवाड यांच्या हमरस्ता नाकारताना, अरुणा सबाने यांचे सूर्य गिळणारी मी, रजिया सुलताना यांच्या रजनी ते रजिया या आत्मकथनांचा परामर्श घेण्यात येणार आहे. त्याच बरोबर प्रस्तुत शोध प्रबंधात सदरील आत्मकथनातील लेखनातील वाङमयीन विशेषांचे सुबोध भाषा, वाक्प्रचार, म्हणी-उखाणे, ओघवती भाषाशैली, त्मक मार्मिक विनोद, निवेदन शैली, छोटी-छोटी वाक्यरचना, संवादात्मकता, भाषा शैली प्रतिमा प्रतिकांचा वापर, आत्मकथनातील संवेदनशीलता, शब्दसंपत्ती, बोलीभाषा, अलंकार, जिवंत अनुभव, सामाजिक, राजकीय, वाङमयीन चळवळीची माहिती इ घटकांच्या आधारे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण आठवे : उपसंहार व निष्कर्ष :

या विभागात स्त्रीयांच्या आत्मकथनात्मक वाङ्मयातील जीवनसंघर्षाचा अभ्यास घेतअसताना आलेलया ठळक निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल.

- आत्मकथन प्रेरणा आणि स्वरुप
- मराठी आत्मचरित्र आणि आत्मकथनाची परंपरा
- जीवन संघर्ष : स्वरुप आणि विशेष
- स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवन संघर्षाच्या रुपाचा शोध
- स्त्रियांच्या आत्मकथनात्मक वाङ्मयातील भाषाशैली

- स्त्रियांच्या लेखीकांचा जीवनपरिचय व साहित्य परिचय
- मराठी आत्मचरित्र आणि आत्मकथन यातील साम्य आणि भेद.

प्रस्तुत संशोधनात प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये स्त्रियांच्या आत्मथनातील जीवन संघर्ष या विषयातून निष्पन्न झालेले निष्कर्ष, गृहीतकृत्यांची पडताळणी आणि त्यावर आधारित महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भ सूची

मुळ संदर्भ सूची :-

१) आमटे साधनाताई : समिधा, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती २००२

२) सपकाळ सिंधुताई : मी वनवासी, रिया प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती २०१३

३) महाजन उल्का : कार्य आणि कार्यकर्ते, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती २०१२

४) भोसले सुनिता : 'विंचवाचे तेल', रोहन प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २०१९.

५) आवाड सरिता : 'हमरस्ता नाकारताना', राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती जुलै २०२०

६) भावे पुष्पा : 'लढे आणि तिढे', मनोविकास प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती ११ नोव्हे. २०२०

७) सबाने अरुणा : 'सुर्य गिळणारी मी', मनोविकास प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती मार्च २०२२

८) सुलताना रजिया : 'रजनी ते रजिया' मनोविकास प्रकाशन पुणे पहिली आवृत्ती २०२३.

सहाय्यक ग्रंथसूची :-

१) अहिरे प्रतिभा (डॉ) – समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १५ जानेवारी २०११

२) हस्तक उषा- मराठीतील आत्मचरित्रपर लेखन, स्नेहवर्धन पब्लिकेशन, हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती ३० मार्च २००६.

३) जोशी अ.म.(प्रा.)- चरित्र-आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास, पब्लिशिंग हाऊस, पुणे, चतुर्थ आवृत्ती २६ जानेवारी २००७

४) गुंडी नीलिमा – गतकाळाची गाज, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती पुनर्मुद्रण १४ जानेवारी २०२२

५) कणेकर प्रतिभा (डॉ.),राजे छाया (संपा) – मराठी स्त्री आत्मकथनांची वाटचाल (१९१०-२०१०) मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, पहिली आवृत्ती फेब्रुवारी २०२३.

६) भालेराव भरतकुमार भागाजी – स्त्रीवादी आणि १९७५ नंतरची मराठीतील आत्मचरित्रे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २३ जुलै २०२०

७) मेहेंदळे उज्वला (संपा.) दुसऱ्या पिढीचे आत्मकथन, मुंबई मराठी साहित्यसंघ, मुंबई, पहिली आवृत्ती २ नोव्हेंबर २००८.

८) मेहेंदळे उज्वला (संपा) तिसऱ्या पिढीचे आत्मकथन मुंबई मराठी साहित्यसंघ, मुंबई, पहिली आवृत्ती २ ऑक्टोंबर २०१७.

संशोधक
नागरगोजे गंगा हरी
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा दगडगाव
ता.लोहा जि.नांदेड

मार्गदर्शक
डॉ. शिवशेट्टे नारायण अशोकराव
संशोधन मार्गदर्शक
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग,
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
ता.बिलोली जि.नांदेड

संमतीपत्र

दि.   /   /२०२३

प्रति,
मा. उप कुलसचिव
पदव्युत्तर विभाग,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

नागरगोजे गंगा हरी यांचा नियोजित संशोधन आराखडा स्वीकारणे बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणास विनंती करण्यातयेते की, दि.   /   /२०२३ रोजी झालेल्या RAC कमिटीने दिलेली विद्यार्थिनी नागरगोजे गंगा हरी यांना **सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा शोध** (विशेष संदर्भ : साधनाताई आमटे, उल्का महाजन, सिंधुताई सपकाळ, सुनिता भोसले, सरिता आवाड, पुष्पा भावे, रजिया सुलताना, अरुणा सबाने) या विषयावर मी मार्गदर्शन करणार आहे.

करिता पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव त्यांचा नियोजित संशोधन आराखडा स्वीकारुन उपकृत करावे

ही नम्र विनंती.

मार्गदर्शक

दि.   /   /२०२३

प्रति,
मा. उप कुलसचिव
पदव्युत्तर विभाग,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

विषय :- नागरगोजे गंगा हरी यांचा नियोजित संशोधन आराखडा स्वीकारणे बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणास विनंती करण्यातयेते की, दि.   /   /२०२३ रोजी झालेल्या RAC कमिटीने दिलेली विद्यार्थिनी नागरगोजे गंगा हरी यांना **सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मकथनातील जीवनसंघर्षाचा शोध** (विशेष संदर्भ : साधनाताई आमटे, उल्का महाजन, सिंधुताई सपकाळ, सुनिता भोसले, सरिता आवाड, पुष्पा भावे, रजिया सुलताना, अरुणा सबाने) या विषयावर मी मार्गदर्शन करणार आहे.

करिता पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव त्यांचा नियोजित संशोधन आराखडा स्वीकारुन उपकृत करावे

ही नम्र विनंती.

मार्गदर्शक